**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक –५८</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

<u>दिनांक –२०.५.२०२१</u> <u>वेळ –दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **मे-२०२१** ची मासिक मा.महापालिका सभा **गुरुवार** दिनांक **२०/०५/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर यांनी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.अश्विनी संतोष जाधव

५) मा.सारीका शिवाजी सस्ते

६) मा.राहुल गुलाब जाधव

७) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

८) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

९) मा.गायकवाड निर्मला मनोज

१०) मा.गोफणे अनुराधा देविदास

११) मा.बारसे प्रियांका प्रविण

१२) मा.अजित दामोदर गव्हाणे

१३) मा.लांडगे सारिका संतोष

१४) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१८) मा.सावळे सिमा रविंद्र

१९) मा.लांडे विक्रांत विलास

२०) मा.गीता सुशिल मंचरकर

२१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२२) मा.अनुराधा गणपत गोरखे

२३) मा.केशव हनुमंत घोळवे

२४) मा.मंगला अशोक कदम

२५) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२६) मा.अश्विनी भिमा बोबडे

२७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२८) मा.संजय बबन नेवाळे

२९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३०) मा.भालेकर प्रविण महादेव

३१) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३३) मा.घोलप कमल अनिल

३४) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३५) मा.चिखले सचिन तुकाराम

३६) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३७) मा.राजू मिसाळ

३८) मा.अमित राजेंद्र गावडे

३९) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४०) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४१) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४२) मा.ढाके नामदेव जनार्दन

४३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४४) मा.करुणा शेखर चिंचवडे

४५) मा.भोईर सुरेश शिवाजी

४६) मा.अपर्णा निलेश डोके

४७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४९) मा.जयश्री वसंत गावडे

५०) मा.कोमल दिपक मेवानी

५१) मा.सुलक्षणा राजू धर

५२) मा.सुजाता सुनिल पालांडे

५३) मा.कदम निकीता अर्जुन

५४) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५५) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५६) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

५७) मा.पाडाळे निता विलास

५८) मा.काळे उषा दिलीप

५९) मा.कोकणे संतोष अंकुश

६०) मा.बारणे अर्चना तानाजी

६१) मा.अभिषेक गोविंद बारणे

६२) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६३) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६४) मा.बारणे माया संतोष

६५) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

६६) मा.दर्शले रेखा राजेश

६७) मा.कलाटे राहुल तानाजी

६८) मा.कलाटे मयूर पांडुरंग

६९) मा.कामठे तुषार गजानन

७०) मा.चोंधे आरती सुरेश

७१) मा.कस्पटे संदिप अरुण

७२) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७३) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७४) मा.सुनिता हेमंत तापकीर

७५) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७६) मा.कुटे निर्मला संजय

७७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

७८) मा.आंगोळकर सागर सुनिल

७९) मा.मुंढे उषा अंकुश

८०) मा.कदम शशिकांत गणपत

८१) मा.लोखंडे चंदा राजू

८२) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८३) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

८४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८६) मा.नवनाथ दत्तू जगताप

८७) मा.संतोष बबन कांबळे

८८) मा.सोनवणे शारदा हिरेन

८९) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९०) मा. संजय मल्हारराव वाबळे

९१) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९२) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

९३) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.इंदलकर- प्र.नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील- शहर अभियंता, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक (नगररचना), मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त

अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.झगडे, मा.खोत- उपआयुक्त, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे- सह शहर अभियंता, मा.देशमुख, मा.शिंदे, मा.बहुरे-सहा.आयुक्त, मा.मुंढे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.शिंदे-प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.इंगळे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.पाटील, मा.घुबे, मा.वाघुंडे, मा.देसले, मा.टकले, मा.शिंदे, मा.धुमाळ, मा.राऊत, मा.नरोना- कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मा.हराळे, मा.पानसरे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी व मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट या मेट्रो लाईन-१ चे पिंपरी-निगडी मेट्रो लाईन-१ए चे विस्तारीत डीपीआरबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.उत्तम केंदळे – मा.महापौर साहेब, कोरोना महामारीमुळे शहरातील ज्ञात अज्ञात व्यक्तींचे निधन, तौक्ते वादळ मुंबई समुद्रात ४६ जणांचा मृत्यु झालेला असल्याने त्यांस तसेच राजीव सातव – काँग्रेस (आय) नेते खासदार यांचे निधन, प्रसन्न चिंचवडे – करुणा शेखर चिंचवडे नगरसेविका यांचे चिरंजीव यांचे निधन, प्रमोद निसळ – भाजपाचे जेष्ठ नेते माजी सरचिटणीस यांचे निधन, अजित सिंग – राष्ट्रीय लोकदलचे नेते यांचे निधन, संभाजीराव काकडे – जेष्ठ नेते माजी खासदार यांचे निधन, चारुशिला प्रभाकर कुटे–माजी नगरसेविका यांचे निधन, उषाताई गोरे– आपला आवाजचे संपादक बापुसाहेब गोरे यांच्या पत्नी यांचे निधन, कैलास सरतापे – पिंपरी चिंचवड महापालिकेचे कर्मचारी यांचे निधन, बाबासाहेब महाराज इंगळे –

सुप्रसिध्द किर्तनकार यांचे निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी व सदर सभा दि.२०/५/२०२१ रोजी दु.२.२५ पर्यंत तहकूब करावी अशी सूचना मी मांडतो.

मा.सुरेश भोईर - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर- सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.महापौर – आजची सभा दि.२०/५/२०२१ रोजी दुपारी २.२५ पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

-------

**(**उषा उर्फ माई मनोहर ढोरे**)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक –५८**

**सभावृत्तांत**

**(दि.२०.५.२०२१ (दु.२.००) ची तहकूब सभा )**

दिनांक –२०.५.२०२१ वेळ –दुपारी २.२५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.५.२०२१ (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा **गुरुवार** दिनांक **२०/०५/२०२१** रोजी दुपारी **२.२५** वाजता मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर यांनी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.अश्विनी संतोष जाधव

५) मा.सारीका शिवाजी सस्ते

६) मा.राहुल गुलाब जाधव

७) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

८) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

९) मा.गायकवाड निर्मला मनोज

१०) मा.गोफणे अनुराधा देविदास

११) मा.बारसे प्रियांका प्रविण

१२) मा.अजित दामोदर गव्हाणे

१३) मा.लांडगे सारिका संतोष

१४) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१८) मा.सावळे सिमा रविंद्र

१९) मा.लांडे विक्रांत विलास

२०) मा.गीता सुशिल मंचरकर

२१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२२) मा.अनुराधा गणपत गोरखे

२३) मा.केशव हनुमंत घोळवे

२४) मा.मंगला अशोक कदम

२५) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२६) मा.अश्विनी भिमा बोबडे

२७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२८) मा.संजय बबन नेवाळे

२९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३०) मा.भालेकर प्रविण महादेव

३१) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३३) मा.घोलप कमल अनिल

३४) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३५) मा.चिखले सचिन तुकाराम

३६) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३७) मा.राजू मिसाळ

३८) मा.अमित राजेंद्र गावडे

३९) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४०) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४१) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४२) मा.ढाके नामदेव जनार्दन

४३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४४) मा.करुणा शेखर चिंचवडे

४५) मा.भोईर सुरेश शिवाजी

४६) मा.अपर्णा निलेश डोके

४७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४९) मा.कोमल दिपक मेवानी

५०) मा.सुलक्षणा राजू धर

५१) मा.सुजाता सुनिल पालांडे

५२) मा.कदम निकीता अर्जुन

५३) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५४) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५५) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

५६) मा.पाडाळे निता विलास

५७) मा.कोकणे संतोष अंकुश

५८) मा.बारणे अर्चना तानाजी

५९) मा.अभिषेक गोविंद बारणे

६०) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६२) मा.बारणे माया संतोष

६३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

६४) मा.दर्शले रेखा राजेश

६५) मा.कलाटे राहुल तानाजी

६६) मा.कलाटे मयूर पांडुरंग

६७) मा.कामठे तुषार गजानन

६८) मा.चोंधे आरती सुरेश

६९) मा.कस्पटे संदिप अरुण

७०) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७१) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७२) मा.सुनिता हेमंत तापकीर

७३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७४) मा.कुटे निर्मला संजय

७५) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

७६) मा.आंगोळकर सागर सुनिल

७७) मा.मुंढे उषा अंकुश

७८) मा.कदम शशिकांत गणपत

७९) मा.लोखंडे चंदा राजू

८०) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८१) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

८२) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८३) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८४) मा.नवनाथ दत्तू जगताप

८५) मा.संतोष बबन कांबळे

८६) मा.सोनवणे शारदा हिरेन

८७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

८८) मा. संजय मल्हारराव वाबळे

८९) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९०) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

९१) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.इंदलकर- प्र.नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.कुंभोजकर-मुख्य

लेखापरिक्षक, मा.राजन पाटील- शहर अभियंता, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक (नगररचना), मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.झगडे, मा.खोत- उपआयुक्त, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे- सह शहर अभियंता, मा.देशमुख, मा.शिंदे, मा.बहुरे-सहा.आयुक्त, मा.मुंढे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.शिंदे-प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.इंगळे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.पाटील, मा.घुबे, मा.वाघुंडे, मा.देसले, मा.टकले, मा.शिंदे, मा.धुमाळ, मा.राऊत, मा.नरोना- कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैदयकीय अधिकारी, मा.हराळे, मा.पानसरे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी व मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.महापौर**-** उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) महापालिका सभा क्रमांक - ५३ दि.१८/२/२०२१ (दु.२.०० व २.३०), दि.२२/२/२०२१, दि.९/३/२०२१ व दि. १८/३/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**ब**) मा.महापालिका सभा क्रमांक – ५४ दि.१८/३/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) विशेष मा.महापालिका सभा क्रमांक – ५५ दि.२३/३/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १

दिनांक- २०/५/२०२१ खाते- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३४१, दि.०३/०२/२०२१

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.६०८ दि.१८/३/२०२१

महाराष्ट्र शासन यांचेकडील पीसीसी/३००९/संक्र-२३३/प्र.क्र.३६९/१० नवि-२२ दि.०६/०८/२०१० आदेशान्वये र.रु.२५,००,०००/- इतके अनुदान कन्या विद्यालय, देहु यांना देण्यास मान्यता दिलेली आहे. अद्यापपर्यंत कन्या विद्यालय, देहु यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अनुदानापोटी र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) अदा करणेत आलेले आहेत. तर उर्वरित र.रु.१५,००,०००/- अदा करणे बाकी आहे. कन्या विद्यालय, देहु या विद्यालयाचे नावा ऐवजी संत जिजाबाई कन्या विद्यालय, देहु असा बदल झाला आहे. तरी नावात बदल झाल्याने संत जिजाबाई कन्या विद्यालय, देहु यांना उर्वरित अनुदानापोटी र.रु.१५,००,०००/- देणेस मान्यता देणेत यावी.

मा.अंबरनाथ कांबळे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सुरेश भोईर – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर- विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक - ६३६ विषय क्रमांक - १

दिनांक- २०/५/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३४१, दि.०३/०२/२०२१
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.६०८ दि.१८/३/२०२१

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - २

दिनांक- २०/५/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.स्विनल म्हेत्रे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.३६, दि.७/५/२०२१

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, यांचेकडील विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पदोन्नती कोटयातील रिक्तपदे भरणेबाबत शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र./३६६/१६-ब दिनांक २० एप्रिल २०२१ अंमलबजावणीकामी जाहिर झाला आहे. सदर निर्णयानुसार बाब क्र.२ व ३ अंतर्गत समाविष्ट तरतूदीनुसार दिनांक २५/०५/२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रुजू असलेले कर्मचारी दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवा जेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील असे घोषित केले आहे. त्यानुसार विद्युत विभागाच्या मुळ आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता विद्युत पदावर १३ वर्षे सेवेत असलेले व मनपा सेवेत एकूण ३२ वर्षे सेवा पुर्ण झालेले श्री.संदेश सखाराम चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत हे सह शहर अभियंता (विद्युत/यांत्रिकी) या मनपा आस्थापनेवरील मंजूर रिक्त पदावर सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इ. सर्व निकषास अनुसरुन पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील सह शहर अभियंता (विद्युत/यांत्रिकी) हे पद रिक्त असलेने श्री.संदेश सखाराम चव्हाण, कार्यकारी अभियंता, विद्युत यांस सदर पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

मा.अंबरनाथ कांबळे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सुरेश भोईर – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- दि. 20.05.2021 रोजीच्या मासिक मा. महापालिका सभेच्या कार्यक्रम पत्रिका क्र. 58 मधील विषय क्र. 2 करिता मूळ प्रस्तांव अंतर्भूत उल्लेख असलेला शासन निर्णय क्र शासन निर्णय क्र.बीसीसी 2018 प्रक्र/ 366/16-ब दि. 20 एप्रिल 2021 अधिक्रमित झालेने सोबत जोडलेल्या नविन निर्गत झालेल्या शासन निर्णय क्र.बीसीसी 2018 प्रक्र/ 366/ 16-ब दि. 07 मे 2021 नुसार देखील सेवाज्येष्ठतेच्या निकषांवर श्री.संदेश सखाराम चव्हाण, कार्यकारी अभियंता (वि), हे पात्रता धारण करत असलेने त्यांस सहशहर अभियंता (वि/यां) ह्या रिक्त पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

तसेच म.न.पा अस्थापनेवर सहशहर अभियंता (वि/यां) अभिमानाचे एक पद रिकामे असून सदर पदावर श्री. संदेश सखाराम चव्हाण कार्यकारी अभियंता (वि) यांची पदोन्नतीने नेमणूक झाल्यास श्री. संदेश सखाराम चव्हाण यांचे रिक्त होणा-या कार्यकारी अभियंता (वि) पदावर श्री. अशोक नागो आडसुळे, उपअभियंता (वि) यांची पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी. श्री. अशोक नागो आडसुळे हे कार्यकारी अभियंता (वि) पदास लागणारी शैक्षणिक अर्हता, अनुभव, सेवाजेष्ठता धारण करीत असून, पदोन्नतीस पात्र ठरत आहेत.

सबब म.न.पा अस्थापनेवर सह शहर अभियंता (वि/यां) पदावर श्री.संदेश सखाराम चव्हाण, कार्यकारी अभियंता (वि) यांची पदोन्नतीने नेमणूक झाल्यास त्यांचे रिकाम्या होणा-या कार्यकारी अभियंता (वि) पदावर श्री.अशोक नागो आडसुळे, उपअभियंता (वि) यांची पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच मा.विधि समिती ठराव क्र.36 दि.7/5/2021, नुसार व शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र./३६६/16-ब., दि.७/५/२०२१ मधिल बाब क्र. २ व ३ अंर्तगत समाविष्ठ तरतुदी नुसार दि.२५/५/२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रूजु असलेले कर्मचारी दि.२५/५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील या निर्णया नुसार पदोन्नती देणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार मा.महापालिका सभेकडे कार्यपत्रिका क्र.५८ ११/५/२०२१ मधिल विषय क्र.2 मान्यतेकामी ठेवणेत आलेला आहे. त्यास अनुसरून कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदाच्या जागा रिक्त असल्यामुळे १) श्री.नरेश रामकिसन रोहिला २) श्री.संजय शंकरराव खरात ३) श्री.सुनिल यशवंतराव पाटील ४) श्री.संजय अनंत तुपसाखरे या उपअभियंता यांची उपअभियंता या पदावर ५ वर्षे वा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण झालेली असल्यामुळे, त्यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या म.न.पा.अस्थापनेवरील मंजूर रिक्त पदावर म.न.पा. नोकरभरती नियमावली, आकृतीबंध २०२० नुसार व त्यातील तरतुदी नुसार सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इत्यादि सर्व निकषास अनुसरून पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यकारी अभियंता स्थापत्य हि पदे रिक्त असल्याने वर नमुद केलेल्या उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. सभावृतांत कायम होणेची वाट न पाहता मंजुर ठरावानुसार कार्यवाही तातडीने करणेत यावी.

तसेच शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र./३६६/16-ब., दि.७/५/२०२१ मधिल बाब क्र. २ व ३ अर्तंगत समाविष्ठ तरतुदीनुसार दि.२५/५/२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रूजु असलेले कर्मचारी दि.२५/५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील या निर्णयानुसार पदोन्नती देणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार मा.महापालिका सभेकडे कार्यपत्रिका क्र.५८/११/५/२०२१ मधिल विषय क्र.2 मान्यते कामी ठेवणेत आलेला आहे. त्यास अनुसरून कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदाच्या जागा रिक्त असल्यामुळे श्रीमती सिनकर प्रेरणा प्रदिप यांची उपअभियंता या पदावर ५ वर्षे वा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण झालेली असल्यामुळे, त्यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या म.न.पा. अस्थापनेवरील मंजूर रिक्त पदावर म.न.पा. नोकरभरती नियमावली, आकृतीबंध २०२० नुसार व त्यातील तरतुदी नुसार सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इत्यादि सर्व निकषास अनुसरून पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यकारी अभियंता स्थापत्य हि पदे रिक्त असल्याने वर नमुद केलेल्या उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. सभावृतांत कायम होणेची वाट न पाहता मंजुर ठरावानुसार कार्यवाही तातडीने करणेत यावी.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. संभाजी ऐवले यांनी नागरवस्ती विभागामध्ये खुप चांगल्या पध्दतीच काम करुन सुध्दा त्यांच्यावर खुप मोठया प्रमाणात अन्याय झालेला आहे तरी त्यांची सुध्दा पदोन्नती व्हावी अशी आमची इच्छा आहे असं मी तुम्हांला सांगतो, धन्यवाद.

मा.मंगला कदम - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता जो सचिन चिखले यांनी संभाजी ऐवलेंचा विषय मांडला त्याला माझ अनुमोदन आहे. हाताची पाचही बोट सारखी नसतात, काम कस केल, काय केल, कस झाल तो विषय बाजूला ठेवून त्यांना पदोन्नती दिली पाहीजे कारण की महापालिकेमध्ये ते कामाला लागल्यापासून आपल्याकडे आहेत आणि आता त्यांची रिटायर्डमेंट होण्याची वेळ आलेली आहे. मा.महापौर साहेब, तुम्ही आयुक्तांना सांगाव की आपल्या महापालिकेचा कर्मचारी आहे आणि त्यांना पदोन्नती मिळाली पाहीजे. शेवटी सगळीच माणस एकसारख काम नाही करत, प्रत्येकाची काम करण्याची पध्दत

वेगवेगळी असते. तरी मा.महापौर साहेब, तुम्ही यात लक्ष घालून आयुक्त साहेबांना सांगा की संभाजी ऐवले यांची पदोन्नती झाली पाहीजे.

सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मंगलाताईनी जो विषय मांडला तो अत्यंत चांगला आहे ३१ तारखेला ऐवले रिटायर्ड होणार आहेत त्यामुळे सचिन चिखले आणि मंगलाताईनी मांडलेल्या विषयाला अनुमोदन आहे.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य कार्यकारी अधिकारी या अभिनामाचे पद ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत मंजूर आहे या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व सेवा जेष्ठतेनुसार श्री.बी.बी.कांबळे, सहाय्यक आरोग्याधिकारी हे पात्र असल्याने त्यांची रिक्त होणा-या आरोग्य कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी.

मा.आशा धायगुडे-शेंडगे – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

मा.उत्तम केंदळे – मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारल्या आहेत.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खर म्हणजे सचिन चिखले यांनी संभाजी ऐवले यांचा पदोन्नतीचा विषय मांडलेला आहे. मागच्या वर्षी संभाजी ऐवले यांचा जीबी मध्ये ठराव झालेला आहे आणि मा.महापौर साहेब, आपण सुध्दा संभाजी ऐवले यांचा हा रिटायर्डचा शेवटचा महीना असल्यामुळे त्यांना पदोन्नती दयावी म्हणून आपण सातत्याने मा.आयुक्त यांचेकडे अग्रह करतो. परंतु त्यांनी सांगीतल की ते नाही त्यांना आम्ही तेच सांगीतल की शासनाकडून आरआर मध्ये नसेलतरी शासनाच्या आधिन राहून तुम्ही त्यांना ही पदोन्नती देवू शकता. त्यामुळे एखादा अधिकारी सेवानिवृत्त होतो त्यांनी ३८ वर्षे सेवा या महापालिकेमध्ये केलेली आहे आणि त्यांनी प्रामाणिकपणे त्यांची सेवा केलेली आहे अशा कर्तव्यदक्ष अधिका-याला पदोन्नती दिली पाहीजे अशाप्रकारची भूमीका आपण सुध्दा घेतलेली आहे तरी आपण ही सर्वसाधारण सभा संपल्यानंतर त्वरीत आयुक्तांच्याकडे आग्रह धरु आणि ऐवले साहेबांना त्याठिकाणी न्याय देण्याचा प्रयत्न आपण करु. तरी विषय क्रमांक २ मंजूर करावा अशी मी विनंती करतो.

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. सचिन चिखले यांनी विषय मांडला आणि आता नामदेवरावानी सांगीतल की ऐवले यांचे काही दिवसच राहीलेले आहेत आणि त्यांचा मागे देखील अशाप्रकारचा ठराव झाला होता. आपण सर्वानी

आयुक्तांकडे फॉलोअप केला परंतु नामदेवरावानी सांगीतल स्टेटची मान्यता लागेल परंतु आता त्यांचे दहा ते पंधरा दिवस राहीलेले आहेत अस असताना आपण आयुक्तांकड आग्रह धरला की आपण त्यांना चार्ज जरी दिलातरी त्यांना रिटायरमेंटच्या आदि कुठल्याही आदेशाची वाट न बघता त्यांना चार्ज दिलातर त्यांचा तो सन्मानच होईल. कारण त्यांनी खुप वर्षे महापालिकेमध्ये सेवा केली, नागरवस्तीमध्ये सुध्दा त्यांनी काम केल आहे. मला वाटत आमच्या भागात महीलांचा जर कार्यक्रम असेलतर तीथे नेहमी मार्गदर्शन करायला संभाजीराव ऐवले पुढे असतात. अस असताना माई आपण आयुक्तांशी बोलाव दहा पंधरा दिवस राहीलेले आहेत त्यांना न्याय मिळावा अशी संपुर्ण सभागृहाची इच्छा आहे आपण सुध्दा आयुक्त साहेबांशी बोलाव, आपण एकत्र आयुक्तांकडे जायच म्हणलतरी आम्ही यायला तयार आहोत परंतु नामदेवरावांच्या मनात यायला पाहीजे अस वाटत. परंतु माई कुठलही राजकारण न करता आपण स्वत: आयुक्तांशी बोलाव आपल्या भागात राहणारी व्यक्ती आहे, त्यांच काम चांगल आहे आपल्या भागातील महीलांच प्रचंड प्रमाणात ते प्रबोधन करतात अस असताना त्यांना जाताना जर हा सन्मान दिलातर निश्चितच तो स्वागर्तह असेल, धन्यवाद.

मा.महापौर – विषय क्रमांक २ उपसूचनांसहीत मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६३७ विषय क्रमांक - २

दिनांक- २०/५/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.स्विनल म्हेत्रे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.३६, दि.७/५/२०२१

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, यांचेकडील विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पदोन्नती कोटयातील रिक्तपदे भरणेबाबत शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र./३६६/१६-ब दिनांक २० एप्रिल २०२१ अंमलबजावणीकामी जाहिर झाला आहे. सदर निर्णयानुसार बाब क्र.२ व ३ अंतर्गत समाविष्ट तरतूदीनुसार दिनांक २५/०५/२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रुजू असलेले कर्मचारी दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवा जेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील असे घोषित केले आहे. त्यानुसार विद्युत विभागाच्या मुळ आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता विद्युत पदावर १३ वर्षे सेवेत असलेले व मनपा सेवेत एकूण ३२ वर्षे सेवा पुर्ण झालेले श्री.संदेश सखाराम चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत हे सह शहर

अभियंता (विद्युत/यांत्रिकी) या मनपा आस्थापनेवरील मंजूर रिक्त पदावर सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इ. सर्व निकषास अनुसरुन पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील सह शहर अभियंता (विद्युत/यांत्रिकी) हे पद रिक्त असलेने श्री.संदेश सखाराम चव्हाण, कार्यकारी अभियंता, विद्युत यांस सदर पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच दि. 20.05.2021 रोजीच्या मासिक मा. महापालिका सभेच्या कार्यक्रम पत्रिका क्र. 58 मधील विषय क्र. 2 करिता मूळ प्रस्तांव अंतर्भूत उल्लेख असलेला शासन निर्णय क्र शासन निर्णय क्र.बीसीसी 2018 प्रक्र/ 366/16-ब दि. 20 एप्रिल 2021 अधिक्रमित झालेने सोबत जोडलेल्या नविन निर्गत झालेल्या शासन निर्णय क्र.बीसीसी 2018 प्रक्र/ 366/ 16-ब दि. 07 मे 2021 नुसार देखील सेवाज्येष्ठतेच्या निकषांवर श्री.संदेश सखाराम चव्हाण, कार्यकारी अभियंता (वि), हे पात्रता धारण करत असलेने त्यांस सहशहर अभियंता (वि/यां) ह्या रिक्त पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच म.न.पा अस्थापनेवर सहशहर अभियंता (वि/यां) अभिमानाचे एक पद रिकामे असून सदर पदावर श्री. संदेश सखाराम चव्हाण कार्यकारी अभियंता (वि) यांची पदोन्नतीने नेमणूक झाल्यास श्री. संदेश सखाराम चव्हाण यांचे रिक्त होणा-या कार्यकारी अभियंता (वि) पदावर श्री. अशोक नागो आडसुळे, उपअभियंता (वि) यांची पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे. श्री. अशोक नागो आडसुळे हे कार्यकारी अभियंता (वि) पदास लागणारी शैक्षणिक अर्हता, अनुभव, सेवाजेष्ठता धारण करीत असून, पदोन्नतीस पात्र ठरत आहेत.

सबब म.न.पा अस्थापनेवर सह शहर अभियंता (वि/यां) पदावर श्री.संदेश सखाराम चव्हाण, कार्यकारी अभियंता (वि) यांची पदोन्नतीने नेमणूक झाल्यास त्यांचे रिकाम्या होणा-या कार्यकारी अभियंता (वि) पदावर श्री.अशोक नागो आडसुळे, उपअभियंता (वि) यांची पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मा.विधि समिती ठराव क्र.36 दि.7/5/2021, नुसार व शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र./३६६/16-ब., दि.७/५/२०२१ मधिल बाब क्र. २ व ३ अर्तंगत समाविष्ठ तरतुदी नुसार दि.२५/५/२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रूजु असलेले कर्मचारी दि.२५/५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील या निर्णया नुसार पदोन्नती देणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानुसार मा.महापालिका सभेकडे कार्यपत्रिका क्र.५८ ११/५/२०२१ मधिल विषय क्र.2 मान्यतेकामी ठेवणेत आलेला आहे. त्यास अनुसरून कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदाच्या जागा रिक्त असल्यामुळे १) श्री.नरेश रामकिसन रोहिला २) श्री.संजय शंकरराव खरात ३) श्री.सुनिल यशवंतराव पाटील ४) श्री.संजय अनंत तुपसाखरे या उपअभियंता यांची उपअभियंता या पदावर ५ वर्षे वा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण झालेली असल्यामुळे, त्यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या म.न.पा.अस्थापनेवरील मंजूर रिक्त पदावर म.न.पा. नोकरभरती नियमावली, आकृतीबंध २०२० नुसार व त्यातील तरतुदी नुसार सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इत्यादि सर्व निकषास अनुसरून पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यकारी अभियंता स्थापत्य हि पदे रिक्त असल्याने वर नमुद केलेल्या उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होणेची वाट न पाहता मंजुर ठरावानुसार कार्यवाही तातडीने करणेत यावी.

तसेच शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र./३६६/16-ब., दि.७/५/२०२१ मधिल बाब क्र. २ व ३ अर्तगत समाविष्ठ तरतुदीनुसार दि.२५/५/२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रूजु असलेले कर्मचारी दि.२५/५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील या निर्णयानुसार पदोन्नती देणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार मा.महापालिका सभेकडे कार्यपत्रिका क्र.५८/११/५/२०२१ मधिल विषय क्र.2 मान्यते कामी ठेवणेत आलेला आहे. त्यास अनुसरून कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदाच्या जागा रिक्त असल्यामुळे श्रीमती सिनकर प्रेरणा प्रदिप यांची उपअभियंता या पदावर ५ वर्षे वा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण झालेली असल्यामुळे, त्यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या म.न.पा. अस्थापनेवरील मंजूर रिक्त पदावर म.न.पा. नोकरभरती नियमावली, आकृतीबंध २०२० नुसार व त्यातील तरतुदी नुसार सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इत्यादि सर्व निकषास अनुसरून पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यकारी अभियंता स्थापत्य हि पदे रिक्त असल्याने वर नमुद केलेल्या उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होणेची वाट न पाहता मंजुर ठरावानुसार कार्यवाही तातडीने करणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य कार्यकारी अधिकारी या अभिनामाचे पद ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत मंजूर आहे या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व

सेवा जेष्ठतेनुसार श्री.बी.बी.कांबळे, सहाय्यक आरोग्याधिकारी हे पात्र असल्याने त्यांची रिक्त होणा-या आरोग्य कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६३८ विषय क्रमांक - ३

दिनांक- २०/५/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/९/८०/२०२१ दि.२६/०२/२०२१
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.१५,
दि.०२/०३/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेत मौजे किवळे येथील स.नं. ३९ पैकी सुमारे ४०००.०० चौ.मी. क्षेत्र १/१२६ अन्वये टेलिकॉम सेंटर या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यात आलेले आहे. सदर आरक्षणासाठी संपादन संस्था दूरसंचार विभाग असून सदर विभागाने या जागेची त्यांना आवश्यकता नसल्याचे महापालिकेस कळविलेले आहे. सदर जागेच्या आरक्षणाचे प्रयोजन बदलल्यास ती जागा मनपाच्या इतर प्रयोजनासाठी उपयोगात येऊ शकते. सदर जागेला लागून आ.क्र. ४/१२४ अन्वये विभागीय कार्यालयासाठी जागा आरक्षित आहे त्यामुळे टेलिकॉम सेंटरसाठी आरक्षित असलेले ४०००.०० चौ.मी. क्षेत्र विभागीय कार्यालय या प्रयोजनासाठी आरक्षित करणे आवश्यक वाटते. त्यासाठी म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सूचनला प्रसिध्द झाल्यानंतर महानगरपालिकेस प्राप्त होणा-या हरकती/सूचना अर्जांबाबत संबंधितांना सुनावणी देणे, तद्अनुषंगिक सर्व वैधानिक प्रक्रिया पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करणे, यासाठी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.अंबरनाथ कांबळे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.संदिप वाघेरे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मौजे किवळे येथील स.नं. ३९ पैकी सुमारे ४०००.०० चौ.मी. क्षेत्र १/१२६ अन्वये टेलिकॉम सेंटरसाठी रिझर्व्हेशन होतं. त्याच्या अनुषंगानेच असाच एक विषय होता त्यासाठी मी गेले तीन ते चार वर्षे झाले प्रयत्न करतो पिंपरी गावातील स्मशानभूमी अत्याधुनीक करण्यासाठी. आपले पहीले उपसंचालक नगररचनाचे होते पवार साहेब त्यांनी तो विषय सगळया टिपण्या वगैरे व्यवस्थित करुन आयुक्तांच्या मान्यतेसाठी पाठवला होता, त्याच्यानंतर त्यांची बदली झाली त्यांच्या जागी उपसंचालक प्रभारी चार्ज नाळे यांच्याकडे देण्यात आला. नाळे साहेब महापालिकेच्या नगररचना विभागामध्ये रुजू झाले त्या व्यक्तीला महापालिकेच्या प्रशासनामध्ये कधी काम केल्याचा अनुभव नाही, राज्यशासनाच्या लेव्हलला कधी काम केलेल नाही. त्यांनी प्राधिकरण याठिकाणी काम केलेल आहे. त्यांनी आयुक्तांना चुकीच सांगीतल म्हणजे जे पदावरती कार्यरत असणारे पवार साहेबांनी जो प्रस्ताव बनवला होता तो प्रस्ताव नाळे यांनी आयुक्तांना चुकीचा आहे असं सांगीतल  व ते सांगण्यासाठी सुध्दा त्यांना तीन महीने लागले परंतु त्यांना हा चुकीचा प्रस्ताव कसा आहे किंवा काय आहे हे सुध्दा सांगता आलेले नाही. जो पॉजीटीव्ह प्रस्ताव होता तो यांनी आयुक्तांना तोंडी सांगीतल की तो चुकीचा आहे म्हणून.......

मा.आशा धायगुडे-शेंडगे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब, संदिपभाऊंचा काय बोलतात ते काहीच समजत नाही, काहीच आवाज येत नाही.

मा.नामदेव ढाके – मा.महापौर साहेब, संदिपभाऊ तुमचा आवाज फाटतोय.

मा.सिमा सावळे – मा.महापौर, आवाज काहीच ऐकायला येत नाही.

मा.राहुल कलाटे – संदिप तुझा आवाज कट होतो, काहीच कळत नाही.

मा.संदिप वाघेरे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आपल्याकडे उपसंचालक नगररचनामध्ये नाळे साहेब म्हणून आलेले आहेत त्यांना राजेंद्र पवार यांच्या जागी चार्ज देण्यात आलेला आहे. नाळे हे प्रभारी म्हणून आहेत. यांच्याकडे पुर्णत: चार्ज नव्हता त्यांच निगेटीव्ह थींकींग आहे. माझ्या पिंपरी गावातला स्मशानभूमीचा प्रस्ताव, राजेंद्र पवार यांनी सगळया गोष्टीची पुर्तता करुन जागेच्या ताबेदारीचा प्रस्ताव आयुक्तांकडे ठेवला, प्रस्ताव ठेवल्यानंतर त्यांची बदली झाली आणि त्यांच्या

जागी प्रतिनियुक्तीवरती नाळे साहेब आले आणि नाळे साहेबांनी आयुक्तांना अस सांगीतल की हा प्रस्ताव चुकीचा आहे परंतु तो कसा चुकीचा आहे हे आडीच तीन महीन्याच्या काळात सांगीतलेल नाही. दुसरी गोष्ट राजेंद्र पवार उपसंचालक ज्यांना महाराष्ट्र शासनामधील काम केलेचा अनुभव आहे त्यांनी तो प्रस्ताव ठेवला होता आणि आता आलेले नाळे साहेब म्हणतात की हा प्रस्ताव चुकीचा आहे. डेप्युटीच्या माणसाला एक्झिक्युटीव्हचा चार्ज दिला त्यामुळे महापालिकेच्या नगररचना विभागाच खुप मोठ नुकसान होईल. नाळे यांना राज्यशासनात आणि महापालिका स्तरावर काम केल्याचा अनुभव नाही. नाळे साहेबांकडे प्रतिनियुक्तीचा चार्ज आहे. आपल्याकडे राज्यशासनाचा अधिकारी मागवून घ्या आणि यांना राज्यशासनाकडे परत पाठवा किंवा आपल्याकडे राजेंद्र पवार होते त्यांना सहा महीन्यासाठी आपल्या महापालिकेमध्ये परत रुजू करुन घ्या. कारण आता ब-याच लोकप्रतिनीधीना त्यांचा आतापर्यंतचा अनुभव आलेला आहे. नाळे साहेबांना शासनाकडे परत पाठवावे एवढ बोलून थांबतो.

मा.महापौर – ठिक आहे तुमच म्हणण ऐकलेल आहे. विषय क्रमांक ३ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६३९ विषय क्रमांक - ४

दिनांक- २०/५/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/किवळे/१२७/२०२१, दि.२७/०४/२०२१

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.१८, दि.०४/०५/२०२१

मौजे तळवडे येथील गट क्र. ९ मधील नियोजित अशुद्ध जलउपसा केंद्रासाठी पोहोच रस्ता म्हणून मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याचे जागेचे

संपादन करून मिळणेची मागणी पाणीपुरवठा विभागाने केलेली आहे. सदर गट क्र. ९ मंजूर विकास योजनेनुसार औद्योगिक वापर विभागामध्ये आहे. तसेच देहूरोड अँम्युनेशन डेपोच्या २००० यार्डाच्या प्रतिबंधित क्षेत्रात (Red zone) आहे. बाजारमुल्यदर तक्त्यातील (सन २०२०-२१) मुल्य विभाग क्र. १८/७ नुसार गट क्र. ९ साठी रू. ५५००/- चौ.मी. इतका दर नमुद आहे. तथापि, सदर रस्त्याचे क्षेत्र हे प्रतिबंधित क्षेत्रात असलेने व प्रतिबंधीत क्षेत्रात कोणतेही बांधकाम अनुज्ञेय नसल्याने बाजारमुल्यदर तक्त्यातील मार्गदर्शक सूचना मधील अ.क्र. २०(ह) नुसार रू.५५००/- चौ.मी. दराचे ४०% प्रमाणे येणा-या दराने रस्त्याने बाधित ४२०० चौ.मी. क्षेत्रासाठी रू. १,०२,६७,४००/- मुल्यांकन रक्कमेस मा. आयुक्त यांनी दि. २५/११/२०२० चे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. सदरचे मुल्यांकनाबाबत संबंधित जागा मालक यांचेशी पाणीपुरवठा विभागाचे संबंधित प्रतिनिधीसह चर्चा झाली असता त्यांनी मुल्यांकन रक्कम अमान्य असल्याचे सांगितले. तसेच जागेचा मोबदला हा खाजगी वाटाघाटीने (रोख स्वरूपात) महाराष्ट्र शासनाच्या चालू बाजार मुल्य दराने १.३ पट एवढा मिळणेची मागणी केली आहे.

"भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम – २०१३ च्या कलम २६ अन्वये"केवळ वार्षिक मुल्य दर तक्त्यातील दरावर आधारित नुकसान भरपाई दिली जात नसून तरतुदीप्रमाणे येणारे मुल्य विचारात घेणेबाबत तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडील दि.१२/०५/२०१५ चे शासन निर्णयामध्ये, खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेणेबाबत, मार्गदर्शक तत्वे नमूद आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करताना संबंधित जमीन मालकास मोबदला अदा करताना मा. महापालिका सभा ठराव क्र. ७७४, दि.२०/११/२०१५ व ठराव क्र.९१५, दि.२९/०८/२०१६ नुसार नुकसान भरपाई अदा करताना ज्या मिळकतधारकांचे क्षेत्र ० ते ३०० चौ.मी. आहे. अशा बाधित छोट्या मिळकतधारकांना १००% दिलासा रक्कम व ३०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंडधारकांना ३०% दिलासा रक्कम याप्रमाणे कार्यवाही केली जाते.

सदर जागेची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस आवश्यकता असल्याने महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.१२/०५/२०१५

रोजीच्या“खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेणेबाबत” शासन निर्णयानुसार ताब्यात घेणेची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील मोबदला निश्चितीसाठीच्या जिल्हा स्तरीय समिती मार्फत करता येणे शक्य आहे. सदरची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.अंबनाथ कांबळे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सविता खुळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आमची समिती स्थापन होवून जवळ जवळ सात ते आठ महीने झालेले आहेत. आजपर्यंत समितीने शहरातील गोरगरीब महीला व जनतेसाठी आम्ही ठराव पारीत केले आहेत परंतु सदर ठरावावर आजपर्यंत कुठलीही कारवाई झालेली नाही. या गोरगरीब जनतेनी आम्हांला निवडून दिलेल आहे तेव्हा आम्ही इथ आलो आहोत. आमची, प्रशासनाची जबाबदारी आहे की गोरगरीब, गरजू लोकांना त्यांच्या हाक्काच साहीत्य दयायची. त्यानुसार आम्ही आपणास मागणी करतो आम्ही ठराव केलेला आहे, साहीत्य वाटपाचा, स्वच्छता कीट असेल, वेल्डींग मशीन असेल असे वेगवेगळे गोरगरीबासाठी ठराव मंजूर केले आहेत पण ते जनतेला कधी मिळणार. मागील तीन वर्षापासून साहीत्याचा ठराव आम्ही महीला व बालकल्याण समितीला केला होता. सदरचे साहीत्य गोरगरीब जनतेला देण्यासाठी कोण विरोध करत आहे, ही गोरगरीब जनता येत्या निवडणूकीतच त्यांची जागा त्यांना दाखवून देईल. आम्ही मागील साडेतीन वर्षापासून महीला व बालकल्याण समितीमार्फत साहीत्य गोरगरीब जनतेला मिळण्यासाठी मागणी करत आहोत. आपण प्रशासनाला सुचना कराव्यात की महीला व बालकल्याण समितीने जे ठराव केले आहेत त्याची प्रशासनाने अंमलबजावणी करावी आणि तसेच संभाजी ऐवले यांच्या पदोन्नतीसाठी आमचे चेअरमन चंदा लोखंडे यांनी सुध्दा पत्र दिलेल आहे त्याचाही आपण विचार करावा आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. तळवडे येथील पाणीपुरवठयासंदर्भात विषय आलेला आहे. आंद्र धरणाच पाणी आपण आणणार होतो. त्याच्याऐवजी आपण निर्णय घेतला की तळवडे याठिकाणच्या नदीपात्रातून आपण ते पाणी उचलायचा निर्णय घेतला आणि त्या अनुषंगाने आपण जागा मिळवली मग ती सिन्थेल कंपनी आणि एमआयडीसीकडून आपण महापालिकेनी प्रयत्न करुन जागा

मिळवली. प्रत्यक्षात तीथ जॅकवेलच काम सुरु झालेल आहे आणि हा जो विषय आपल्या समोर आलेला आहे याच्यामध्ये त्या जॅकवेलला जाणारा १२ मी. चा पोहच रस्ता आपल्याला करायचा आहे आणि त्या अनुषंगाने त्या जागामालकाला मोबदला देण्याच्या संदर्भातला हा विषय आपल्या समोर आलेला आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब याठिकाणी मी आपल्या दोघांच्याही निदर्शनास आणुन देवू इच्छितो की हा जो काही निधी या जागामालकाला देणार आहेत तो आपण भूसंपादन निधीतून देणार आहेत. बजेटच्या मिटींगच्यावेळेस सुध्दा मी आपल्याला कल्पना दिलेली होती की आपण दिडशे कोटी रुपये भूसंपादनासाठी ठेवलेले होते परंतु स्थायी समितीने त्यातले जवळपास शंभर ते सव्वाशे कोटी रुपये दुस-या कामाना वर्ग केले आणि जनरल बॉडीतून सगळेची सगळे पैसे भूसंपादन निधीचे उडवले आहेत. दोन कोटी रुपये शिल्लक भूसंपादनावर ठेवले होते. मा.महापौर साहेब तुम्हांला यावर लक्ष घालाव लागेल, अशा पध्दतीने चुकीच्या पध्दतीने वर्गीकरण करतो परंतु हे अत्यावश्यक काम आहे. मा.महापौर साहेब, पाण्याचा प्रश्न आपल्या सगळयांसाठी अत्यंत महत्वाचा आहे. २०११ साली आपल्याला आंद्रा धरणातून १०० एमएलडी आणि भामा-आसखेड मधुन १६७ एमएलडी एवढ पाणी आपल्याला मंजुर झाल होतं. प्रत्यक्षात आपण आजही याठिकाणी पाणी आणू शकलो नाहीत आणि आपल्या बरोबर पुणे शहरालाही मंजूर मिळाली मी मागच्यावेळेस सुध्दा यासंदर्भात बोलताना या गोष्टीचा उल्लेख केला की पुणे शहरानी भामा-आसखेडच पाणी त्यांच्या शहरात नेलेल आहे आणि ते पाणी त्याठिकाणी पुणेकरांसाठी चालू झालेल आहे. मग पुणे शहर आपल्या पेक्षाही पुढे आहे खेड तालुक्यातून पाणी आणल पिंपरी चिंचवड शहरातून पुणे शहरात ते नेल परंतु आजही आपल्या शहराला याठिकाणी पाणी आणता आल नाही आणि २०११ साली मा.अजीतदादांनी ही मंजूरी दिली परंतु आज २०२१ साल उजाडल आहे तरी आपल्याकडून हे काम झाल नाही मुळात २०११ नंतर ते आपल पाणी लॅप्स झाल नंतर २०१८ साली आपण परत त्याला मंजूरी घेतली आणि आज २०२१ साल आहे इतक्या महत्वाच्या विषयासंदर्भात आज जर पाहील तर कोरोना असल्यामुळे आपल्याला मागच्या वर्षी आणि या वर्षी एवढी तीव्र पाण्याची टंचाई जाणवली नाही. कारण आज बरेच लोक गावाकडे निघून गेलेले आहेत आणि ती लोक गावाकडे निघून गेल्यामुळे याठिकाणी आपल्याला पाण्याची टंचाई जाणवत नाही परंतु जर ते लोक याठिकाणी राहीले असते तर या दोन वर्षात आपल्याला प्रचंड पाण्याची टंचाई जाणवली असती. मग या संदर्भात इतका महत्वाचा विषय असताना आपण अशाप्रकारची भूमीका जर घेत असू म्हणजे

आम्ही त्यावेळेस पण सांगत होतो की भूसंपादनाचा निधी वर्ग करु नका. तरी आपण यासंदर्भात खुलासा केला पाहीजे की हा निधी आता वर्ग झालेला असताना तुम्ही कुठल्या निधीतून या कामाला मंजूरी देणार आहात किंवा या कामाला पैसे देणार आहात. याच्यामध्ये रेडझोन असल्यामुळे आपण त्याला रेडीरेकनेरच्या ४० टक्के रक्कम देण्याची प्रशासनाने भूमीका घेतली तशाप्रकारची आपण जागा मालकाशी चर्चा केली पण त्यांनी त्याला नकार दिला म्हणून आपण पुन्हा फेरप्रस्ताव याठिकाणी मांडलेला आहे आणि हा आपण जिल्हाधिकारी साहेबांकडे प्रस्ताव देणार आहोत. साधारण एक कोटीच्या आसपास त्यांना देय रक्कम आपण लागतो परंतु जिल्हाधिकारी साहेबांकडे हा विषय जाणार आहे तर त्याठिकाणी आपण छोटया प्लॉटसाठी १.३ चा वगैरे निर्णय घेतला होता परंतु जेव्हा त्यांच्याकडे जाईल तेव्हा त्यांचा नियम दुप्पटचा आहे. केंद्रसरकारने किंवा राज्यसरकारने जे काही धोरण आखलेल आहे जमिनी ताब्यात घेवून त्याला दुप्पट रक्कम देतो तरी एक कोटीच्या ऐवजी ती रक्कम तीन ते चार कोटीच्या आसपास जाणार आहे त्यामुळ या सगळया गोष्टींचा विचार केला गेला पाहीजे. त्यामुळे अशा संदर्भातले जे प्रस्ताव आपल्याकडे येतात त्यावेळी त्याच्या खोलात गेल पाहीजे आणि उदयाच्या काळामध्ये आपल्याला अशा प्रकारची ज्यावेळेस अत्यावश्यक काम करायची त्यावेळेला अशा ज्या अडचणी निर्माण होतात याच्यावरती आपण गांभीर्याने विचार केला पाहीजे आणि हा जो पाण्याचा प्रश्न आहे तो आपल्या शहराच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचा आहे. आपल्याला या काळामध्ये पाणी मिळणार आहे कारण लोकसंख्या ब-याच प्रमाणात वाढायला लागलेली आहे. परंतु येणा-या सहा सात महीन्यामध्ये पावसाळा आहे परंतु त्यानंतर आपल्याला तीव्र पाणीटंचाई जाणवेल कारण आपल्या शहराची लोकसंख्या जवळपास पंचवीस ते तीस लाखाच्या घरात गेलेली आहे. जर आपल्याला पुरेस पाणी दयायच असेलतर भामा-आसखेड आणि आंद्र या दोन्ही धरणाच पाणी आपल्याला मिळण गरजेच आहे. त्यातल १०० एमएलडी पाणी आपण आंद्रातून आता उचलतो. भामा-आसखेडच आपण नियोजन केलेल आहे त्यात तीन टेंडर काढलेलेत बंद पाईपलाईनचे. जस पवना पाईपलाईनच झाल तसं या दोन पाईपलाईनच होवू नये अशा प्रकरची अपेक्षा माझी या निमीत्तान आपल्याकड आहे. महत्वाचा जो मुद्दा आहे की आपण जेव्हा प्रत्यक्षात बंद पाईपलाईनने भामा-आसखेड आणि आंद्रच पाणी आणू त्यावेळेस आपण जे आता जॅकवेलच काम करतो तळवडे याठिकाणी त्या जॅकवेलसाठी आपण जे काही आपण अठरा कोटी आणि या रस्त्यासाठी जो काही खर्च करतो हा त्यानंतर वाया जाणार आहे. त्यामुळे याचही

शंभर टक्के काम होण गरजेच आहे परंतु भविष्यकाळामध्ये जेव्हा हे काम होईल तेव्हा हा खर्च वाया जाणार आहे याही गोष्टीचा विचार आयुक्त साहेब आपण केला पाहीजे अशाप्रकारची मी आपल्याला सूचना करतो आणि अशा पध्दतीचा चुकीचा भूसंपादन निधी वर्ग केला त्याचा मी याठिकाणी निषेध करतो, धन्यवाद.

मा.मंगला कदम - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौर साहेब, आजची ही जीबी पाच विषयाची होती, तुम्ही जो १ के खाली विषय घेतला त्याचा आवाज सुध्दा आम्हांला आला नाही. १ के खालचा विषय तुम्ही आता वाचला त्याचेवर कुणाला अभ्यास करता येणार नाही आणि आताचा एकच शेवटचा विषय ५ नंबरचा राहणार आहे. आज खासदारांना श्रध्दांजली वाहून जीबी तहकूब करायला पाहीजे होती आणि ज्यावेळेला दोन हजार पेशंट शहरामध्ये पॉजीटीव्ह येत होते त्यावेळेला तुम्ही दहा-दहा तास सभा चालवली आणि आज साडेसहाशे ते सातशे पेशंट पॉझीजीटीव्ह येत असताना तुम्ही ऑनलाइन सभा घेता ते सुध्दा सहाच विषय होते म्हणजे मिटींग होवून होवून कितीवेळ चालली असती. जर तुम्ही दोन हजार पेशंट असताना सुध्दा सभागृहामध्ये मिटींग घेतली आणि आज सहाशे ते साडेसहाशे पेशंट असताना तुम्ही ऑनलाईनमध्ये घेता. ऑनलाईनमध्ये कुणाच कुणालाही कळेना, मगाशी सुध्दा संदिप वाघेरे बोलत होते ते कुणाला काही कळत नव्हतं. मी तर अस म्हणेल की निसळांनी बीजेपी पिंपरी चिंचवडमध्ये आणली त्यांच निधन झाल तरी त्यावर सुध्दा तुम्ही आजची जीबी तहकूब केली नाही. ज्यांनी खरोखरच बीजेपी शहरामध्ये टिकवली निसळसाहेबांनी आणि त्यांना सुध्दा दहा मिनीटाची तुम्ही श्रध्दांजली दिली. नाही त्यावेळेला मिटींग तहकूब करता आणि आजची जीबी सुध्दा तुम्हांला ऑनलाईन घ्यायची काही गरज नव्हती. सभागृहात असताना तुम्ही कितीतरी विषयला उपसूचना देता, त्या उपसूचना दिलेल्या सुध्दा आम्हांला सभागृहात कळत नाहीततर ऑनलाइन इथ कुणाला काय कळणार आहे. याच्या मागच उदिष्ठ आम्हांला समजल पाहीजे. आज तुम्ही सांगा महापालिकेमध्ये स्टॅण्डींगच्या हॉलमध्ये सदस्य बसले नाहीत का, बसलेले आहेतना, विरोधी पक्षनेत्याच्या केबीनमध्ये बसलेले आहेत. तुमच्या केबीनमध्ये बसलेत मग हेच जर सभागृहात बसले असतेतर काय झाल असतं आणि दोन हजार लोक ज्यावेळेस पॉजीटीव्ह होते त्यावेळेस तुम्ही सभा दहा तास चालवली आहे आणि शहरातली संख्या सहाशे ते सातशे पॉजीटीव्ह असताना तुम्ही जर ऑनलाईन सभा घेत

असताल त्यातला १ के चा विषय आम्हांला कळलेलाच नाही. कृपा करुन ऑनलाईन मिटींग घेवू नका. पाच विषय होते काय ऑनलाईन मिटींगची गरज होती आणि त्यातला कुठला महत्वाचा विषय होता ते पण आम्हांला सांगा. भूसंपादनासाठी पैसे आहेत का नाहीत हे माहीत नाही आणि तुम्ही भूसंपादनासाठी मिटींग लावली. आज १ के चा विषय तुम्ही काय घेणार आहेत तो आम्हांला नेमका कळत नाही. सभागृहात असताना बोलू देत नाहीत तुम्ही आता ऑनलाईनमध्ये काय करता आम्हांला काय कळणार आहे. त्यामुळे मा.महापौर साहेब येथून पुढे आमचा या गोष्टीला विरोध आहे. आम्ही पॉजीटीव्ह झालोतरी चालेल आम्हांला शहरातल्या नागरीकांनी निवडून दिलेल आहे, ज्याला भीती वाटत असेल ते घरी बसतील. आम्हांला भीती वाटत नाही आम्ही सभागृहात येवू. ठिक आहेना ज्यांना यायच नाही त्यांनी ऑनलाईन मिटींग नक्कीच अटेंन्ड करावी. मा.महापौर परत असं होवू नये अशी माझी नंम्र विनंती आहे.

मा.आशा धायगुडे-शेंडगे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता मंगलाताईनी जो विषय मांडला तो बरोबर आहे इथे अनेकांचे आवाज ऐकायला बरोबर येत नाहीत आणि हेतू काय आहे जनरल बॉडी घ्यायची म्हणून घ्यायची विषय क्रमांक १, २, ३ वाचायचे हा विषय नाही, निश्चितपणे तुम्ही सगळयांना बोलू देता परंतु हे होत असताना ऑनलाईनमध्ये ज्या काही त्रुटी आहेत त्या त्रुटीवरती कुठतरी मात करण्याची गरज आहे. आता जो भूसंपादनाचा विषय होता त्याला अनुषंगाने प्रभाग क्रमांक ३० मध्ये २०१७ साली एका रस्त्याच भूसंपादन केल त्या डीपी रस्त्यातील जे काही नागरीक आहेत त्यांच्यावर अन्याय होवू नये यासाठी आपण त्यांच्यासाठी ट्रान्झिस्ट कॅंप करण्याच मा.हार्डीकर साहेब असतील त्यावेळेस तत्कालीन नगररचनेचे पवार साहेब असतील या सगळयांनी मिळून डिसीजन घेतल आणि आपण ट्रान्झिस्ट कॅंप करण्याचा निर्णय घेतला. टेंडर काढल, जागेचा ताबा नव्हता तर ताबा सुध्दा आपल्या महापालिकेच्या वतीने तहसीलदाराच्या मदतीने कमी घेतला परंतु पुढची प्रक्रीया जी आहे ट्रान्झिस्ट कॅंप बांधणे, नागरीकांना स्थलांतरीत करणे, तीथला रस्ता करणे, रस्ता का करायचा तर तो दापोडीचा परिसर जो आहे त्या परीसराचा विकास होणार आहे, ट्राफीकची समस्या जी जटील झालेली आहे ती सुटणार आहे त्यासाठी मागील चार वर्षे म्हणजे जसं मगाशी अजीत म्हणाले, वाघेरे म्हणाले की सभागृहात निषेध करायचा, हार्डीकर साहेब असतील त्यांच्याकडे आम्ही

दहा दहा मिटींग लावल्या, पाटील साहेबांकडे बोललोत, अतिरीक्त आयुक्तांशी चर्चा केली परंतु निष्फळ चर्चा होवून जातात त्याच्यामध्ये अधिका-यांनी इन्ट्रेस्ट घेतला पाहीजे त्याच्याबाबतीमध्ये कोणतीही प्रक्रीया होताना दिसत नाही. म्हणजे २०१७ ला सभागृहामध्ये निर्णय घेतला आज २०२२ आला आहे तरी तो तडीस नेता येत नसेलतर हा आपला नाकर्तेपणा आहे का अधिका-यांपैकी आपण प्रशासनावरती कंट्रोल ठेवायला कमी पडतोय का याचा सारासार विचार करण्याची गरज आहे. तो डीपीचा रस्ता तो ३० मी. करण्याऐवजी १८ मी. करण्याचा निर्णय झाला आणि तो रस्ता सुध्दा आज २०२२ पर्यंत होत नसेल, जर दापोडी गावाचा विकास होत नसेलतर आम्ही काय करतोय. ज्या खात्रीने आम्हांला लोकांनी निवडून दिलेल असतं, त्यांनी आमच्यावर विश्वास टाकला त्या विश्वासाला आम्ही पात्र ठरत नाहीत आणि आम्ही पात्र न ठरण्याच कारण म्हणजे प्रशासन आणि अधिकारी आहेत. जी काही प्रक्रीया करणे आवश्यक होत, जीबीच्या माध्यमातून जे काही ठराव करणं अपेक्षीत होतं ते सगळे आपण याठिकाणी केले. परंतु जी काही पुढची प्रक्रीया असते, रस्त्याला मुरुम टाकणे असेल, ताबा असेल, तीथ रस्त्यावरची दुकान असतील ते काढणं, रस्त्याचा ताबा घेणं या बाबतीमध्ये कोणताही अधिकारी जबाबदारीने काम करत नाही. कोणतरी एखादा बेवडा येतो तीथे येवून दंगा करतो ठेकेदाराला पळून लावतो, ठेकेदारही पळून जातो. मग काय आपण धरायला गेलो तरी विषय, आपण अधिका-यांना सांगायला गेलो तरी विषय आजकाल तर रेकॉर्डीग वगैरे काय काय सगळया गोष्टी होतात. तरी मा.महापौर साहेब माझी आपल्याला विनंती आहे की आपण माझ्या प्रभागातील ३० मी. चा रस्ता जो आहे तो १८ मी. चा विकसीत करण्याचा निर्णय घेतला त्या संदर्भात त्वरीत बैठक लावावी किमान २०२२ ला आम्ही दापोडीतून बाहेर पडणार आहोत असं एकूण वाटत कारण दोनचा प्रभाग झाल्यानंतर. परंतु तीथल्या नागरीकांना आम्ही काहीतरी दिल याच मानसीक समाधान आम्हांला मिळाल पाहीजे या दृष्टिकोनातून आपण प्रयत्न करावेत अशी विनंती करते, थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.महापौर – विषय क्रमांक ४ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६४० विषय क्रमांक - ५
दिनांक- २०/५/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.लेखा/८/कावि/४७८/२०२१ दि.२३/४/२०२१

मा.सहसंचालक(म.न.पा.ले.प) स्थानिक निधी लेखा परिक्षण रायगड भवन, सातवा मजला, नवी मुंबई-४००६१४ यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांचे सन २०१५-१६ या कालावधीचे लेखापरिक्षण पूर्ण केलेले असून त्यांनी त्यांचे अहवालामध्ये एकत्रित १७२ परिच्छेद उपस्थित केले आहेत. सदर अहवाल व त्यातील परिच्छेदाचे प्राप्त अनुपालन अवलोकनार्थ नगरसचिव विभागात ठेवले आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम १०(१) अन्वये मा. सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखा परिक्षा, नवी मुंबई यांचेकडील अनुपालन पूर्तता अहवाल सादर करणेकामी मान्यता देणेत येत आहे.
मा.अंबरनाथ कांबळे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.
मा.महापौर – विषय क्रमांक ५ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ६

दिनांक- २०/५/२०२१ खाते- मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.बक्षेका/जनि/कावि/२३०/२०२१ दि.२७/४/२०२१

वरील विषयांकित कामाचा महानगरपालिकेच्या सन२०२०-२१ च्या सुधारित व सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये भु. ग. यो. निधी अंतर्गत पा.क्र. ४५१ वर समावेश आहे. सदर सर्व साधारण स्वरूपाच्या कामासाठी ढोबळ मानाने अंदाजपत्रकीय र.रु.५,००,००,००० अक्षरी र.रु. (पाच कोटी) व सन २०२१-२२ साठी र.रु.५,००,००० अक्षरी र.रु. (पाचलाख) इतकी तरतूद ठेवण्यात आली आहे.

चिंचवड केशवनगर व वाल्हेकरवाडी येथील अस्तित्वातील पंपिंग स्टेशनच्या जागा या जलसंपदा विभागाने दर्शविलेल्या निळ्या पूररेषेच्या अंतर्गत येत असून शासनाच्या डिसेंबर सन २०२० मध्ये नव्याने आलेल्या UNIFIED DEVELOPMENT CONTROL AND PROMOTION REGULATIONS FOR MAHARASHTRA STATE – 2020 च्या नियंत्रण नियमावली नुसार जलसंपदा विभागाने दर्शविलेल्या पुररेषा अंतर्गत नवीन मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे आता शक्य होणार आहे. त्यानुसार सदर कामांचे तपशीलवार अंदाजपत्रके (DPR) व आराखडे तयार करणेकामी सल्लागारांची नेमणूक करण्यात आली आहे.

चिंचवड केशव नगर सर्व्हे नंबर २९२ येथे ९५० चौ.मी.क्षेत्रात महानगरपालिकेचे पंपिंग स्टेशन अस्तित्वात आहे. सद्यस्थितीत केशवनगर व आजुबाजूच्या भागातील मैलापाणी पवना नदी किनारी असलेल्या केशवनगर पंपिंग स्टेशन मार्फत भाटनगर व लिंक रस्त्यावरील चिंचवड मैलाशुद्धीकरण केंद्रात(STP) पंपिंग नलिकेद्वारे पाठविले जाते. सदर केशवनगर येथे पंपिंग स्टेशन आवारातच मैलाशुद्धीकरण केंद्र(STP) बांधल्याने एनर्जी सेव्हिंग (वीजबचत) होणार आहे. नवीन STP बांधल्याने पंपिंग नलिका वार्षिक देखभालीचा खर्च कमी होणार आहे आणि पंपिंग नलिकेची गळती होऊन होणारे नदीचे प्रदूषण थांबणार आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच नदी प्रदूषण कमी होणेकामी, मैलाशुद्धीकरण प्रक्रियेचे विकेंद्रीकरण (Decentralization) करणेकामी चिंचवड केशवनगर पंपिंग स्टेशन आवारातच नवीन मैला शुद्धीकरण प्रकल्प (STP) बांधणे अत्यावश्यक आहे.

